


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२९ •शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील: उपमुख्यमंत्री अजित पवार




- विविध कार्यक्रमांना उपस्थिती ; मॅरेथॉन बैठकांनी बीड गाजले
- अधिकारी कर्मचाऱ्यांची धावपळ ; रस्ते चकाचक
- काम न करणाऱ्या गुत्तेदारांची एजन्सी ब्लॅक लिस्ट करण्याची दादांची धमकी
- सहकार्य करा नसता पालकमंत्रीपद सोडतो दादांचा थेट दम !
- छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाची पहानी
- २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर
- कंकालेश्वर मंदिर विकासासाठी पुरातत्व विभागाला स्पष्ट सूचना
- महसूल भवनाचे भूमिपूजन,
- नवीन शासकीय इमारतींची बैठक
- जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयासाठी विशेष आढावा
- वैद्यनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखड्याचा निधी वाढवून ३५१ कोटींवर









बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी मी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असून, जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत पत्रकार बांधवांचे सहकार्य महत्वाचे असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार

▶▶ उर्वरित पान २ वर

## • महसूल भवनाचे भूमिपूजन

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महसुल भवनाचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगतीपथावर असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची देखील पाहणी करत संबंधीतांकडून महसूल भवन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची माहिती घेवून संबंधीतांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच इमारतीचे काम दर्जेदार करण्याच्या सूचनाही संबंधीतांना त्यांनी दिल्या.

## • एकाच दिवशी जिल्ह्यात विविध ठिकाणी ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड

हवामान बदल, वाढते प्रदूषण, पाण्याची टंचाई यामुळे वृक्ष लागवड ही काळाची गरज झाली आहे. बीड जिल्ह्याने एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक रोपांची लागवड करून विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हरित बीड अभियानात सहभागींचे कौतुक केले. या रोपांचे संवर्धन, संगोपनाची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. जिल्हा प्रशासनाने वर्षभरात एक कोटी रोपांची लागवड करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन हरित बीड अभियानाचा संकल्प पूर्णत्वास न्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

## • कौशल्यवर्धन केंद्राचे भूमिपूजन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व टाटा टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात कौशल्यवर्धन केंद्र प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन व कोनशीलेचे अनावरण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याहस्ते आज झाले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे Center For Invention, Innovation, Incubation and Training कौशल्यवर्धन केंद्र जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी व औद्योगिक उत्पादनास चालना देण्यासाठी हा प्रकल्प ▶▶ उर्वरित पान २ वर

## • वास्तूरचनाकार यांच्याकडून सविस्तर आढावा घेवून आवश्यक त्या सूचना

बीड – अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासून बीड–मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच अंबेजागाई येथील लमान तांडा येथे नवीन कारागृहासाठी लागणाऱ्या जागेसाठी पाठपूरावा करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कंकालेश्वर देवस्थानाची असलेली १२ एकर जागेस संरक्षण भिंत उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे निर्देश दिले.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ धनंजय मुंडे यांच्या मुळेच उभे : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

### महामंडळ नियोजन विभागाकडे घेण्यासाठी प्रयत्न करणार : धनंजय मुंडे यांच्या विनंती वरून अजित दादांची ग्वाही

• अजित दादांच्या हस्ते ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी मिशन साथी योजनेचा शुभारंभ



बीड । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले. पुढील पिढीमध्ये धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे हे त्यांच्या या कामाचा वसा घेऊन काम करत आहेत. धनंजय सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याद्वारे धनंजय मुंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# मतदारसंघातील रस्ते आणि विविध विकास कामासंदर्भातील आ.क्षीरसागरांच्या मागण्यांना ना.अजितदादांची सकारात्मकता

• महामार्गासाठी भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना मावेजा देण्याचीही केली मागणी




बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील रस्ते आणि इतर विकास कामांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांच्याकडे मागणी केली असता, ना.अजितदादांनी लगेचच संबंधित अधिकाऱ्यांना समोरासमोरच सूचना देऊन बीड विधानसभा

▶▶ उर्वरित पान २ वर

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर

### खा.बजरंग सोनवणे यांचे प्रयत्न फळाला, केजला दिले झुकते माप

बीड । प्रतिनिधी

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे. केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेअमर नाईकवाडे यांनी शहरातील विकास कामांची केली मागणी

### अजितदादांनी सदरील कामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी देण्याचे आश्वासित केले



बीड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा आज बीड शहरात दौरा झाला. या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी त्यांचे स्वागत करत शहराच्या विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन त्यांना सादर केले. यावेळी गटनेते फारुख पटेल, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, ▶▶ उर्वरित पान २ वर

# झाड जगवा अण ग्रामपंचायत कडून अकराशे रुपये बक्षीस मिळवा ; ग्राम पंचायत वडगाव गुंधा येथील उपक्रम



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे वडगाव गुंधा येथे हरित महाराष्ट्र हा शासनाचा उपक्रम ग्रामपंचायत कार्यकारणी व लोक सहभागातून वृक्षारोपण चा उपक्रम राबवण्यात आला, या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा शासकीय इमारती शेतातील बांध, व सरकारी जागेत वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्ष लागवड उपक्रम प्रसंगी जिल्हा परिषद ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत 'आपली आष्टी, हरित आष्टी' वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ

• आमदार सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आपली आष्टी, हरित आष्टी या संकल्पनेतून वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ आज आष्टी शहरातील गवारे वस्ती रोड, उपबाजार समिती परिसर आणि घनकचरा व्यवस्थापन केंद्र परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार मा. श्री. सुरेश



धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी स्वतः झाडे लावून मोहिमेत सहभाग नोंदवला. याप्रसंगी सुरेश धस म्हणाले , प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या उपक्रमात धनश्री बिगर शेती नागरी पतसंस्था मर्या. आष्टी, श्री गणेश विद्यालय आष्टी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी आणि टायगर अक्ॅडमी आष्टी या संस्थांनी सक्रिय

▶▶ उर्वरित पान २ वर





# विचार तर कराल...?

हायवेवरील कोणत्याही स्वस्त ढाब्यात जेवायला गेलात तर मेनूमध्ये किमान ६ पदार्थ पनीरचे असतात. ५ स्टार हॉटेलमध्ये गेलात, तर वेजिटेरियन सेक्शनमध्ये ६0% डिशेस पनीरच्या असतात. ३0 रुपयांत ६ पनीर मोमोज? ५0 रुपयांत पनीर पिझ्झा? १00 रुपयांत बटर पनीर? ४0 रुपयांत पनीर कुलचा? २0 वर्षांपूर्वीही, मी जेव्हा सांगायचो की मी पनीर खात नाही, तेव्हा लोक म्हणायचे, इतकी प्रोटीनयुक्त गोष्ट का नाही खात? तेव्हापासून मला वाटायचं की हा पनीर खरा नसावा. मग मी घरीच पनीर बनवायला सुरुवात केली. मी ७0 रुपयांत १ लिटर अमूलचं फुल क्रीम दूध घेतो, त्यातून साधारण २00 ग्रॅम पनीर मिळतो. म्हणजेच, १ किलो पनीर बनवण्यासाठी ५ लिटर दूध लागते, ज्याची किंमत ३५0 रुपये होते. म्हणजेच, खऱ्या दुधाचा पनीर बनवला तर त्याची किमान किंमत ३५0 रुपये तरी येते. जर दुधाचा फॅक्टरी भाव लिटरला ५0 रुपये धरला तरीही, फक्त दुधासाठी २५0 रुपये खर्च येतो. यात मजुरी, गॅस, इंधन वगैरे जोडल्यास हा खर्च ६0 रुपयांपर्यंत पोहोचतो. सप्लाय चेन, लॉजिस्टिक्स वगैरे जोडल्यास ही किंमत ६३ रुपयांपर्यंत जाते. म्हणजेच, किमान ३१५ रुपये किलो खर्च येऊन, जर दुकानदाराने १0% नफा घेतला (जो प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त असतो), तर ग्राहकाला तो पनीर किमान ३४५ ते ३५0 रुपये किलो भावाने मिळाला पाहिजे. आता जर तुम्ही २00 किंवा २५0 रुपयांत किलो पनीर घेत असाल, तर दुकानदाराने दानछत्र उघडलं आहे का, जे तो तुम्हाला खर्चापेक्षा २५% कमी दरात विकतो? खऱ्या पनीरची किंमत आणि प्रमाण समजून घ्यायचं असेल, तर घरी पनीर बनवून पहा, कळेल. मग येतो अनालॉग पनीर म्हणजे पनीरसारखा दिसणारा आणि त्याच्या टेक्स्चरसारखा पदार्थ, ज्याचे मुख्य घटक म्हणजे पावडर दूध, वनस्पती तेल, पाम ऑइल, अरारोट, स्टेबिलायझर्स आणि डेव्हलपिंग एजंट्स. पावडर मिल्कमध्ये फॅट नसल्यामुळे, त्यात डालडा आणि पाम ऑइल मिसळलं जातं, ज्यामुळे त्याची घनता वाढते. ही तेलंच ती आहेत, जी आपल्या रक्तवाहिन्यांत जमून जातात. हा अनालॉग पनीर तुम्हाला मोठ्या ५ स्टार हॉटेल्समध्येसुद्धा मिळतो, भले तुम्ही पनीर टिक्का खात असाल किंवा पनीर दो प्याजा... याहूनही खालच्या दर्जाचा असतो युरिया, डिटर्जंट आणि मैद्याच्या मिश्रणातून बनवलेला पनीर म्हणजे तो पनीर, जो तुम्ही ३0 रुपयांत ६ मोमोजमध्ये किंवा ५0 रुपयांत पनीर लोडेड पिझ्झा बर्गरमध्ये खात आहात. हा युरिया थेट तुमच्या मूत्रपिंड आणि यकृतावर हल्ला करतो आणि दीर्घकाळ सेवन केल्यास जीवघेणा ठरू शकतो. भारतात दररोज ६४ कोटी लिटर दूध उत्पादन होते. जर हे सर्व दूध फाडून पनीर बनवलं गेलं, तर साधारण १ कोटी २0 लाख किलो पनीर बनू शकतो. पण दररोज पनीरचा वापर साधारण १५,000 टन आहे. हे शक्य आहे का, की १ कोटी ५0 लाख किलो पनीर ६४ कोटी लिटर दुधातून बनेल? बाजारात मिळणाऱ्या ८0% पेक्षा जास्त पनीर नकली आहे. हे नकली पनीर रस्त्याकडच्या ढाब्यांपासून ते ५ स्टार हॉटेल्सपर्यंत सर्वत्र वापरलं जात आहे. गेल्या ३0 वर्षांत यकृत आणि मूत्रपिंडाच्या रोगांमध्ये जबरदस्त वाढ झाली आहे, यामागचं कारण काय? कधीतरी त्या छोट्या छोट्या गल्ल्यांमध्ये जाऊन बघा, जिथे युरियाची मोठमोठी पातेली उकळत असतात. जे लोक ते बनवत आहेत, त्यांना सांगा की, ते स्वतःच बनवलेला पनीर खाऊन दाखवावा. पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही हॉटेलमध्ये पनीरची डिश ऑर्डर कराल, तेव्हा सांगा की, एक कच्चा पनीरचा तुकडा आणून दाखवावा. मी नक्की सांगतो, ते हजार बहाणे करतील. मी हे अजमावून पाहिलं आहे. एका रेस्टॉरंटवाल्याने तर मला साफ सांगितलं, जेवायचं असेल तर जेवा, नाहीतर जा. आम्ही सॅम्पल दाखवणार नाही. दुग्धजन्य पदार्थ हा आजच्या काळातील सर्वात मोठा घोटाळा आहे. दुर्दैवाने, सरकारसुद्धा याबाबत काही करू शकत नाही. नकली उत्पादनं दररोज पकडली जातात, पण आपल्या कायद्यात त्यासाठी फक्त काही दंड किंवा छोटीशी शिक्षा आहे. यामुळे होणाऱ्या लाखो अप्रत्यक्ष मृत्यूंसाठी त्यांना जबाबदार धरलं जात नाही.

◆ पान १ वरून पुढे...

## बीड जिल्ह्याच्या...

यांनी सांगितले.बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री श्री. पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमात श्री. पवार हे बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री प्रकाश सोळंके, विजयसिंह पंडित, विक्रम काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, बीड जिल्हा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि अध्यक्ष संतोष मानूरकर यांची उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, बीड शहरात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध दर्जेदार विकास कामे करुन बीड जिल्ह्याच्या वैभवात भर घालण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. विकास कामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या. बीड जिल्ह्याचा विकास गतिमान करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु असुन, महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारतीचे कामे दर्जेदार व्हावीत यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची जिल्ह्यात नियुक्ती केली आहे. बीड शहरातील म्हत्वाच्या रस्त्याचे विस्तारीकरण करुन, रस्त्यांवर पसरलेले तारांचे जाळे कमी करण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्यामुळे शहराचे सौंदर्यात भर पडणार आहेत. जिल्ह्याचा विकास करतांना काही कठोर निर्णय देखील घ्यावे लागणार आहेत. यासाठी शहरातील नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधुन, बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे सुरु करण्याचा प्रयत्न असल्याचे श्री. पवार यांनी सांगितले. तसेच बीड जिल्हा पत्रकार संघाने केलेल्या सत्काराबद्दल समाधान व्यक्त करताना श्री. पवार म्हणाले की, पत्रकारांचा जिल्ह्याच्या विकासाकरीता नेहमीच महत्वाचे सहकार्य राहिले असुन, यापुढे ही असेच सहकार्य राहील अशी अपेक्षाही श्री.पवार यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

## कौशल्यवर्धन केंद्राचे...

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळासोबत विकसित करण्यात येत आहे. चार हजार चौरस मीटर जागेवर उभारल्या जाणाऱ्या या केंद्रात दरवर्षी ७ हजार विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना गुणवत्तापूर्ण नोकऱ्या, तांत्रिक अभ्यासक्रमांची आधुनिक जोड आणि उद्योगासाठी आवश्यक अभियंते, ऑपरेटर, तंत्रज्ञ या ठिकाणीच निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## लोकनेते गोपीनाथराव...

अर्थमंत्री म्हणून मी या महामंडळाला धनंजय च्या विनंतीवरून कायम स्वरूपी निधी मिळण्याची तरतूद करून दिली. धनंजय च्या प्रयत्नातून उभे राहिलेले हे महामंडळ ऊसतोड कामगारांच्या उन्नतीचे माध्यम ठरणार आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आज बीड येथील कार्यक्रमात बोलताना केले.

सामाजिक न्याय विभाग व बीड जिल्हा परिषदेच्या संयुक्त प्रयत्नातून ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी खास मिशनसाठी या अभियानाचा शुभारंभ अजितदादा यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला तसेच या निमित्ताने ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासणी बाबतचे शिबिरही आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अजितदादा पवार आपल्या मनोगतामध्ये बोलत होते. धनंजय च्या कार्यकाळात या महामंडळाच्या माध्यमातून विविध योजनांचा आरंभ करण्यात आला. ऊसतोड कामगारांच्या अपघातामध्ये मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याची योजना आपण सुरू केली. मात्र एखाद्या कर्त्या व्यक्तीचा जीव गेल्यानंतर पाच लाखांचे रक्कम ही अपुरी असल्यामुळे या रकमेत दुप्पट वाढ करावी अशी ही विनंती धनंजय मुंडे यांनी केली होती ती विनंती आपण मान्य केली असून याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येईल असेही यावेळी बोलताना अजितदादा पवार म्हणाले. दरम्यान मिशन साथिया योजनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या गट (टोळी) मधील एका महिलेला याबाबतचे प्रशिक्षण व आरोग्य किट दिली जाणार असून अशा एक हजार किटचे वितरण आज करण्यात आले. मिशन साथिया उपक्रमामुळे ऊसतोड कामगार महिलांच्या ऊस तोडणी हंगामामध्ये बाहेरगावी असताना आरोग्याची काळजी घेण्यास मदत होणार आहे. याप्रसंगी आ. धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. नमिता मुंदडा, आ. विजयसिंह पंडित, कल्याणराव आखाडे, डॉ. योगेश क्षीरसागर, माधव निर्मळ, अविनाश नाईकवाडे, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन रहमान यांसह आदी उपस्थित होते.

◆ पान १ वरून पुढे...

## मतदारसंघातील रस्ते...

मतदारसंघाच्या विकासासाठीची सकारात्मकता स्पष्ट केली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार २ दिवस बीडमध्ये आलेले आहेत. या दोन दिवसांत ना.अजितदादांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अनेक प्रश्न आणि बाबींकडे बैठकांच्या माध्यमातून नियोजन सुरू केले आहे. या अनुषंगाने गुरूवारी (दि.७) रोजी झालेल्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील विकासाचे विविध प्रश्न आणि प्रस्ताव बैठकीत ना.अजितदादांसमोर मांडले असता, ना.अजितदादांनी जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्तावांच्या संदर्भात सकारात्मक सूचना दिल्या. ना.अजितदादांनी पुढील कामांबाबत दर्शवली सकारात्मकता- राष्ट्रीय महामार्ग २११ (नवीन क्र.५२) महालक्ष्मी चौक ते जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्ता या दोन्ही साईडने सहा (६) लाईन रोडसाठी व दोन्ही साईडने ड्रेनेजसाठी मा.अजित दादांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. शिवशारदा ते अमरधाम स्मशानभुमी पर्यंत भुयारी गटारसाठी मा.दादांनी तत्वत: सूचना दिल्या.ग्रामीण भागातील मुख्य रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा खोली, अंगणवाडी बांधकाम, पाणी पुरवठा व्यवस्था, जनसुविधे अंतर्गत स्मशानभुमी बांधकाम, पशु वैद्यकीय दवाखाने, वन विभागाचा विकास, कोल्हापुरी पद्धतीने बंधरे, सिमेंट नाला बंधारे या व इतर आवश्यक असलेले विकास कामे होणे बाबत आ.क्षीरसागरांनी निवेदनासह मागणी केली असता ना.अजितदादांनी सकारात्मकता दर्शविली. बीड शहरातील जिव्हाळ्याचा असलेला रस्त्यांचा प्रश्नही मार्गी लावण्याची केली मागणी- बीड शहरातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. शहरातील रहदारीसाठी रस्त्यांच्या अवस्थेमुळे मोठी अडचण होत आहे. बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न हा नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा झाला आहे. त्यामुळे ना.अजितदादांकडे शहरातील रस्त्यांचा विकासासंदर्भात प्रस्ताव देऊन आ.क्षीरसागर यांनी बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. आ.क्षीरसागर यांनी पालवण चौक ते नगर रोड (धानोरा रोड), मदर टेरेसा चौक ते कालिका नगर कमान (अंकुशनगर मुख्य रस्ता), बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र. ७ मध्ये बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.८ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजुरी वेस पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.०८ मध्ये कारंजा टावर ते पिंगळे गल्ली ते बुंदेलपुरा मस्जिद रोड पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.०८ मध्ये राजुरी वेस ते बलभीम चौक व राजुरी वेस बुंदेलपुरा मार्ग कबाड गल्ली पर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे, बीड न.प.अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये राजुरीवेस-बुंदेलपुरा-कबाडगल्ली मार्गे माळीवेस सिमेंट रस्ता करणे. या कामांना मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ खरवंडी ते राजूरी (न.) रस्त्याच्या भूसंपादनचाही मांडला प्रश्न- बीड मतदारसंघातून राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ गेला आहे. या महामार्गासाठी खरवंडी ते राजूरी नवगण पर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. परंतु संपादनाचा शेतकऱ्यांना मावेजा मिळालेला नाही. विकास कामांसाठी शासनाला जमीन संपादित करूनही मावेजावाचून शेतकरी बांधवांचे अतोनात हाल होत आहेत. याबाबत अनेकवेळा पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने ना.अजितदादांनी हा प्रश्न मार्गी लावून जमीन संपादित झालेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## केंद्राच्या योजनेतून...

ही योजना सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत. केंद्राकडे पाठविले प्रस्ताव- उद्दिष्टाच्या अधीन राहून ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ३००० पेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची ग्रामपंचायत इमारत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे, अशा ग्रामपंचायतींचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या. या ग्रामपंचायतींचा समावेश- धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.

## बीडमध्ये उपमुख्यमंत्री...

शेख निजाम, रामदास सरवदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात शहराच्या विकासासाठी पुढील महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात आल्या. माँ वैष्णो पॅलेसजवळील एमआयडीसीच्या दोन एकर राखीव भूखंडावर उद्यान विकसित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील यशवंत (चमन) उद्यानासाठी भरीव निधी, नगरपरिषद, एमआयडीसी व कृषी उत्पन्न बाजार समितीकडे अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देणे, नाथापूर रोड ते कुर्ला रोड (विश्वदत्त लॉन्स) हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करण्याची मागणी, खंडेश्वरी देवी मंदिराकडे जाणाऱ्या खिंड रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, शहर बायपाससाठी शिदोड येथे सर्विस रस्ता तयार करून एमआयडीसीला थेट कनेक्टिव्हिटी देणे, एमआयडीसीतील सर्व रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, खंडेश्वरी मंदिरासमोरील तालुका क्रीडा संकुलात बॅडमिंटन हॉल, जिम हॉल, वॉकिंग ट्रॅक, संरक्षक भिंत आणि विद्युतीकरणासाठी निधी, शहरातील १७ प्रलंबित डीपी रस्त्यांना तातडीने मंजुरी, बिंदुसरा नदीकाठी संत सावता माळी मंदिरासमोर सुशोभीकरणासह वॉकिंग ट्रॅक विकसित करणे. या सर्व मागण्या शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असून, बीडच्या समृद्ध विकासासाठी या कामांना तातडीने मंजुरी देण्याची अपेक्षा शहराध्यक्ष अमर नाईकवाडे नाईकवाडे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकत, संबंधित विभागांशी समन्वय साधून या कामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी देण्याचे आश्वासन दिले. या दौऱ्यामुळे बीड शहरात विकासाला नवे गतीशील वळण मिळण्याची शक्यता आहे. अमर नाईकवाडे यांनी स्थानिक प्रश्नांचा मागोवा घेत सादर केलेले हे निवेदन शहरहितासाठी एक प्रभावी पाऊल ठरले आहे.

## झाड जगवा...

शाळेतील मुला-मुलींना शाळेचे मुख्याध्यापक श्री दिलीप शिंदे सर यांनी झाडाचे महत्त्व पटवून देताना वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज असून वृक्षांची संख्या आपल्या पृथ्वीवर वाढली नाही तर आपल्या सर्व प्राणी वर्गाचे अतोनात नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही हे अवगत केले.. तदनंतर आईच्या नावाने झाड जगवा आणि ग्रामपंचायत कडून अकराशे रुपये बक्षीस मिळवा या ग्रामपंचायत वडगाव गुंधा च्या उपक्रमाबाबत बोलताना वडगावचे ग्रामपंचायत अधिकारी श्री रामेश्वर घाडगे यांनी उपक्रमाची माहिती देताना आपल्या भाषणात सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर आव्हान केले की आपले महाराष्ट्र शासन वृक्ष संवर्धन वृक्ष संगोपन हरित महाराष्ट्र अशा विविध योजना आपल्या सर्वांच्या भवितव्यासाठी राबवत आहेत. परंतु या वृक्ष लागवडीच्या कामांमध्ये लोक सहभागाची उणीव भासते तसेच झाडांची लागवड केल्यानंतर निसर्गाच्या प्रकोपाने जास्त प्रमाणात झाडे जगत नाहीत व त्याची संवर्धन होत नाही त्यामुळे कुठेतरी त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे ही काळाची गरज आहे हे आपण सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. संत तुकाराम महाराज यांनी ५०० वर्षांपूर्वी आपल्या अभंगातून प्राणी मात्र व झाडांची काय किंमत आहे हे त्यांनी सांगितलेले आहे त्यांच्या अभंग प्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी पक्षीही सुस्वरे आळवीती, या अभंगातून महाराजांनी समस्त सजीव सुशील हा संदेश दिलेला आहे की निसर्गातील जंगल झाडे झुडपे आणि त्यात राहणारे पक्षी सुद्धा आपले सोयरे आहेत आणि या सृष्टीमध्ये त्यांना जगण्याचा स तेवढाच अधिकार आहे आणि झाडझुडप व पक्षी सुद्धा आपली स्तुती करतात हे आपण लक्षात ठेवले पाहिजे, मानव जातीने केलेली जंगलतोड झाड तोड त्यामुळे वृक्ष संवर्धनाचे प्रमाण भरपूर कमी झाले असे झाल्यामुळे कित्येक पशुपक्षी संपुष्टात येऊन त्यांचा ऱ्हास झाला आहे. भविष्यात निसर्गातील झाडांची संख्या अशीच कमी होत राहिली तर आपल्याला आवश्यक असलेल्या प्राणवायूच्या अभावाने मानव प्राण्यांचे देखील रास झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून एक झाड आईच्या नावाने लावून त्याचे आपण वर्षभर संवर्धन करू व हीच काळाची गरज आहे. त्यामुळे आपण सर्वांनी झाडाचे महत्व समजून घेऊन आपल्या स्वतःसाठी तरी झाडाची संख्या वाढवायला पाहिजे यात आपले व इतरांचे हितच आहे. आपले सर्वांचे भविष्य हे समोर ठेवूनच ग्रामपंचायत हा उपक्रम राबवला आहे. या कार्यक्रम प्रसंगी ग्रामपंचायत वडगाव गुंधा च्या सरपंच सौ गंगाबाई सुधाकर नागरगोजे, उपसरपंच श्री सुमंत कोंडीभाऊ गव्हाणे, श्री सुधाकर नागरगोजे, ग्रामपंचायत सदस्य श्री सुहास नागरगोजे,श्री संतोष सानप, ग्रामपंचायत अधिकारी श्री रामेश्वर घाडगे, शाळेचे मुख्याध्यापक श्री दिलीप शिंदे, सुभाष नागरगोजे, सुरेश नागरगोजे, सर्व शिक्षक वृंद व गावचे ग्रामस्थ उपस्थित होत.

## 'हरित महाराष्ट्र...

सहभाग नोंदवला. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे विशेष आभार मानले आणि कौतुक केले. या कार्यक्रमास आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार तथा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, आष्टी नगराध्यक्ष जिया बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, पाटोदा भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले शिरूर कासार भाजपा तालुका अध्यक्ष सुरेश उगलमुगले उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक अरुण भैय्या निकाळजे, गटनेते तथा नगरसेवक किशोर झरेकर, नगरसेवक भारत मुरकुटे, नगरसेवक शरीफ शेख, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक इर्शान खान, नगरसेवक सुनील रेडेकर, नगरसेवक बाळासाहेब घोडके, बाबू कदम, संजय मुळे,शाम वाल्हेकर, इंजि.गहीनाथ शिरसाठ,इंजि. अथहर बेग,लेखपाल साठे यांच्यासह शासकीय अधिकारी-कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## शाश्वत शेती...

पत्रकारितेच्या काळात या पत्रकारांनी कुटुंबाचा किंवा आपल्या घरातील सदस्यांच्या सुखाचा विचार कधीच केला नाही. आज जिल्ह्यातील विविध दैनिकातील शेकडो पत्रकार वयोवृद्ध झाले आहेत. कित्येक पत्रकारांचे आयुष्य संपले तरीही त्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी घर बांधता आले नाही. आजच्या काळात पत्रकारांना प्लॉट खरेदी करून घर बांधणे अशक्य बाब झाली आहे. पत्रकारिता करत असताना आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे यासाठी ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या मागणीचे निवेदन दिले. यावेळी अजित पवार यांनी सकारात्मकता दावून जागा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश उपाध्यक्षा हलीमा शेख, मराठवाडा कार्याध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ बीड जिल्हाध्यक्ष श्री साहस आदोडे, जिल्हा उपाध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट, जिल्हा संघटक श्री संजय कुलकर्णी यांच्या सह्या आहेत.

## शाश्वत शेती...

शाश्वत शेती पद्धती माहिती सांगितली व कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. पाणी फाउंडेशन चे श्री विशाल घोलप यांनी पाणी फाउंडेशन चे काम व सेंद्रिय शेती गट व्यवस्थापन या बाबत माहिती दिली. श्री गणपतराव डोईफोडे यांनी अध्यक्षीय भाषण करताना कृषी विभाग,आत्मा व कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांचे मार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे स्तुति करत मार्गदर्शन किती महत्त्वाचे आहे याचा फायदा शेतकरी बांधवांनी घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री जुबेर पठाण, बीटीएम,आत्मा बीड यांनी केले तर आभार रामप्रसाद डोईफोडे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होणे करिता श्री अशोक काळे सहाय्यक तंत्र व्यवस्थापक, श्री, गणेश घोडके, सहाय्यक कृषी अधिकारी,मौजे इट गावातील शेतकरी यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी नैसर्गिक शेती मध्ये उत्कृष्ट काम करणारे प्रगतशील शेतकरी श्री रामप्रसाद डोईफोडे यांचा सन्मान करण्यात आला. श्री बाबासाहेब कुडके ग्राम विकास अधिकारी इट यांनी सूत्रसंचलन केले. तसेच मा. जिल्हाधिकारी,बीड यांचे आदेशान्वये हरितबीड या योजने अंतर्गत मौजे इट गावात वृक्ष लागवड करून सहभाग नोंदवला. यावेळी सरपंच गणपत डोईफोडे व ग्रामस्थ उपस्थित होते आणि मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

## श्री क्षेत्र चाकरवाडी...

भाविकांना महाराजांनी संदेश दिला. देवाला जर कोणती सेवा आवडत असेल तर ती संत सेवा आहे. जगाच्या पाठीवर उत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवाच आहे. चांगले माणूस बघायचे असेल तर श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये आहे. चांगलं माणूस बनायचं असेल तर ते संप्रदाय आहे. आणि जर परमआनंद कोठे असेल तर तो पण या वारकरी संप्रदायामध्ये आहे. जे माणसे देव, द्वेष, समाजासाठी, देशासाठी जगतात ते अजरामर असतात. पण जे स्वतःच्या स्वार्थासाठी जगतात ते अजरामर राहत नाहीत. चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते.जगात भारतासारखी संस्कृती नाही जगामध्ये संस्कृती च्या बाबती मध्ये ओळखला जाणारा देश म्हणजे भारत देश आहे. सूर्य उगवल्या बरोबर पहिल किरण टाकणारा देश हा भारत देश आहे. महाराष्ट्राला संतभूमी म्हणून ओळखले जाते. परमार्थ मध्ये जात, धर्म, पंत नाही या परमार्थांमध्ये सगळ्यांना सारखे मानले जाते ते एकमेव ठिकाण आहे म्हणजे परमार्थ आहे. महाराजांनी सांगितले की माझे पूर्वी जन्मीचे पुण्य आहे म्हणून मला या ठिकाणी सेवा करण्याचे पुण्य लाभले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे सगळे तीर्थ जर एक ठिकाणी पाहायचे असेल तर ते श्री गुरु यांच्या चरणी पहावे. सगळीकडे भगवान परमात्मा आहे असे एकही ठिकाण सापडणार नाही त्या ठिकाणी भगवान परमात्मा नाही. जर पूजा कोणाची करायची असेल तर श्री गुरु यांची पूजा करा. जगामध्ये उत्तम लाभ होण्याचे ठिकाण म्हणजे संत होय. संताना बघितले तरही लाभ होतो, नमचिंतन, चरण जवळ बसून राहिले तरही लाभ होतो. यावेळी गायनाचार्य दत्ता महाराज चव्हाण, रेवण महाराज महादेव महाराज रोडे, पिंपळे महाराज , माखले महाराज, हनुमंत महाराज घोलप मृदंगाचार्य अमोल महाराज पवार, आविष्कार महाराज क्षीरसागर तसेच त्रिंबक महाराज शेळके, अनिकेत महाराज अनवाने, प्रशांत महाराज क्षीरसागर, श्री क्षेत्र चाकरवाडी चे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, आदर्श शिक्षक परमेश्वर भोसले सर, पत्रकार अभिजीत पवार, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, ग्रामसेवक सुरवसे साहेब, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

## वारकरी संप्रदायाचे...

करण्यात येत आहे. या मध्ये बुधवारी कीर्तन सेवा ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई नगर यांनी समर्पित केली. यावेळी खोले महाराज बोलत होते. जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो ७०० ते ८०० वर्षा पासून सुरू आहे अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तग धरून आहे. आणि चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाला आहे. या वारकरी संप्रदयाचं मूळ हा नाथ परंपरा आहे. गहिनीनाथ महाराजांनी संत निवृत्तीनाथ महाराज यांना दिक्षा दिली. निवृत्तीनाथ महाराज यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांना दिली आज संत ज्ञानेश्वर महाराज यांनी जगाला संदेश दिला. आज वारकरी संप्रदाय दिसत आहे तो नाथ परंपरेतून आला आहे. आज गोरक्षनाथ टेकडीवर जन समुदाय दिसत आहे. तो फक्त गुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा यांच्या त्याग व तपाच फलित आहे. नाथांनी आपल आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केले. आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ यांनी आपलं आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केलं. नाथ परंपरा ही जगाचं कल्याण करण्यासाठी अहोरात्र काम करत आहे. असे विवेचन खोले महाराज यांनी केले. त्यांना मृदुंगसाथ महाराज यांनी दिली. आज संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन झाले. बुधवारी खोले महाराज यांच्या कीर्तन सेवेलाला भाविक भक्तांची प्रचंड गर्दी होती.

## हरित बीड...

चेअरमन रविंद्र निर्मळ, तसेच बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अक्षय वाणी, औदुंबर नाईकवाडे, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ, नाना वाणी, बालाजी निर्मळ, अशोक जाधव, जिवन मुळे, सुखदेव वाणी, शरद भोसले,केशव गिरे यांच्यासह ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या उपक्रमात वड, नांदुरकी पिंपळ, बांबू, करंज, शिसे, लिंब, चिंच आदी विविध प्रकारच्या देशी झाडांची लागवड करण्यात आली.

## मोक्कातील लिडर...

गुन्हा भा.नं.स. ( भारतीय न्याय संहिता) कलम ३१०,३११,११० इत्यादी अंतर्गत दाखल असुन, प्रामुख्याने डकैती, चोरी, डकैती करताना मृत्यू किंवा गंभीर इजा करण्याचा प्रयत्न, तसेच खुनाचा प्रयत्न या स्वरूपाचा आहे व या प्रकरणात एकूण ८ आरोपी आहेत आणि सर्व आरोपी, येरवडा मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

### गोरक्षनाथ टेकडी परिस आहे, सेवा करून जीवनाच सोन करा: ह.भ.प.सांगळे महाराज



**बीड । प्रतिनिधी**

गोरक्षनाथ टेकडी हि गुरू शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे गोरक्षनाथांनी गुरू मच्छिंद्रनाथांची सेवा केली तशी गुरू किसन बाबा महाराज यांची सेवा सद्गुरू गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केली. गुरू शिष्य सेवेतून गोरक्षनाथ टेकडी हि पुनीत झाली आहे. गोरक्षनाथ टेकडी हि परिस आहे येथे तुमच्या आयुष्याच सोन करायचं असेल तर तुम्ही गोरक्षनाथ टेकडी सेवा करा गुरू किसन बाबा महाराज, गुरू नवनाथ बाबा महाराज यांची सेवा करा नक्कीच तुमच्या जीवनच सोन झाल्याशिवाय राहणार नाही असे अभंग विवेचन करताना ह. भ. प. संत ज्ञानेश्वर महाराज सांगळे मुंबई यांनी विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन पुष्प समर्पित करताना व्यक्त केले. या कीर्तनात मृदुंगसाथ ह.भ.प.अरुण महाराज कदम व ह.भ.प.ऋषिकेश महाराज जाधव कीर्तनात कीर्तन साथ ह.भ.प.सुग्रीव महाराज डाके,ह.भ.प. भागवत महाराज नरवडे व ह.भ.प.भीमराज महाराज घुगे नाशिक यांनी दिली. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, संगीत भजन, हरिजागर, भारुड असे भक्तिमय कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे दोन दिवसापासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत

### पाटोदा न.पं. हद्दीतील राऊतवस्ती, मुळेवस्ती रस्त्यावर लाखो रुपय खर्चूनही अंधारातच

**पाटोदा। प्रतिनिधी**

पाटोदा नगरपंचायत हद्दीतील राऊतवस्ती, मुळेवस्ती परिसरातील नागरिक आजही अंधारात जीवन जगत आहेत. संत तुकाराम महाराज विद्यालय ते रेणुका माता मंदिर या रस्त्यावर लाखो रुपये खर्चून विद्युत पोल उभारण्यात आले, मात्र अद्याप त्यावर विद्युत दिवे कार्यान्वित झालेले नाहीत. परिणामी नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या मार्गावर संत तुकाराम महाराज शाळेसह,समाजकल्याण विभागाचे मुलांचे आणि मुलींचे वस्तीगृह तसेच रेणुका माता मंदिर आहे. यामुळे येथे सतत वर्दळ असते. दिवसभर अभ्यास करून रात्री वस्तीगृहात परतणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधारामुळे जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो. महिलांनाही अंधारात ये-जा करताना असुरक्षिततेची भावना जाणवते. पोल लावून काय उपयोग, जर दिवेच चालू होत नसतील ? असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. याबाबत तत्काळ पाठपुरावा करून विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी दिवे कार्यान्वित करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी अपेक्षा संपूर्ण परिसरातून व्यक्त होत आहे.

### बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब गोल्डन अवार्डने ड रविंद्र कानडे सन्मानित



**माजलगाव । प्रतिनिधी**

जालना येथे विभागातील विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या रोटरी क्लब चा पुरस्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्यामध्ये माजलगाव रोटरी क्लब चे अध्यक्ष ॲड रवींद्र कानडे यांना बेस्ट प्रेसिडेंट ऑफ रोटरी क्लब म्हणून गोल्डन अवार्डने सन्मानित करण्यात आले. सन २०२४-२५ या वर्षांमध्ये रोटरी क्लब ऑफ मजलगांव सिटी चे अध्यक्ष ॲड रवींद्र कानडे यांनी अनेक सामाजीक, सांस्कृतिक,आरोग्य व इतर सेवाभावी उपक्रम यशस्वी राबवले त्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य,नेत्र, रक्तदान शिबीर त्याचबरोबर वृक्षारोपण, स्टुडेंट टॅलेंट सर्च परीक्षा, शाळेच्या विद्यार्थ्यांना सायकल, स्पोर्ट शूज ,कम्प्युटर, टीव्ही वाटप असे अनेक विविध उपक्रम राबवण्यात आले. या उल्लेखनीय कार्याची विभागीय स्तरावर नोंद घेत त्यांना सन्मानचिन्ह प्रधान करून सन्मानित करण्यात आले. ॲड रवींद्र कानडे यांनी या पुरस्कार प्राप्ती संदर्भात माध्यमाशी बोलताना सांगितले कि, रोटरी क्लब च्या सचिव सौ. लता जोशी, सर्व प्रोजेक्ट चेअरमन व सन्माननीय सभासद यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले रोटरी क्लब च्या विभागात १८ जिल्हे आहेत त्यामध्ये एकूण १०५ रोटरी क्लब येतात त्यामध्ये आपल्या माजलगाव शहराला मिळेल हा पुरस्कार अभिमानाची बाबा आहे निश्चितच मला सामाजिक सेवेमध्ये कार्य करण्यासाठी प्रेरणा व ऊर्जा देणारा हा पुरस्कार आहे या पुढे देखील मी नेहमीच सामाजिक कार्यासाठी अग्रेसर राहील. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री सुरेश साबू, विद्यमान प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल, क्षितिज झवारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### माजलगावात प्रथमच नवनाथ पारायण सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगावचे ग्राम दैवत चैतन्य धर्मनाथ मंदिर धर्मराज कडा बायपास रोड येथे ४६ वर्षानंतर पहिल्यांदाच पारायण सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पारायणाची सुरुवात दि. ८ शुक्रवारी होणार असून समाप्ती दि १४ गुरुवारी होणार आहे. पारायण वेळ पहिल्या दिवशी सायंकाळी पाच ते सात व नंतर रोज सकाळी सात ते नऊ व शेवटच्या दिवशी महाप्रसाद चे आयोजन करण्यात आले आहे. ज्या भक्तांना पारायणास बसण्याची इच्छा आहे त्यांनी ९८९०४६०२८९, ८७६०००१२१२ या नंबरवर नोंदणी करावी असे आवाहन राजेभाऊ कुमावत, परसराम धारक, अच्युतराव लाटे, रामभाऊ दराडे, बजरंग कुमावत, संजय कर्डिले, विकास गवळी, विजय लालवानी, दत्ता येवले, बालाजी कुमावत यांनी केले आहे.

# दृष्टिहीन मुली, आदिवासी विद्यार्थिनी, बचत गट महिलांकडून राज्यपालांना रक्षाबंधन

**मुंबई । प्रतिनिधी**

दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगर पालिकेअंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी तसेच पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधली व ओवाळले. विवेक रुरल डेव्हलपमेंट सेंटर, भालिवली, जिल्हा पालघर येथून आलेल्या आदिवासी महिलांनाही राज्यपालांना बांबूपासून तयार केलेली राखी बांधली. रक्षाबंधनानिमित्त विविध संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थिनी, भगिनी व बांधवांनी गुरुवारी (दि. ७) राज्यपालांची राजभवन येथे भेट घेऊन त्यांना राखी बांधली व ओवाळले. यावेळी राज्यपालांनी सर्वांच्या राखीचा विनम्रपणे स्वीकार करीत सर्वांची विचारपूस केली व भेटवस्तू दिल्या. राज्यपालांची भेट घेतलेल्या संस्थांमध्ये सिंधुताई सपकाळ यांनी सुरु केलेले ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण,



मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थिनी, मुंबई मनपा अंतर्गत विविध महिला बचत गटांच्या सदस्य, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर,जिल्हा ठाणे येथील विद्यार्थिनी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण (जिल्हा रायगड) येथील विद्यार्थीनी, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)च्या येथील दृष्टिहीन विद्यार्थिनी, प्रतीक्षा महिला बचत गटातील महिला यांचा समावेश होता. भारत विकास परिषद, माटुंगा तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या भगिनी व बांधवांनी देखील राज्यपालांना राखी बांधली.

# धारूर नगरपालिकेच्या वतीने आयोजित हरित बीड अभियानामध्ये एनसीसी व रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर नगरपालिकेच्या वतीने आयोजित घन वृक्ष लागवड मोहिम माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशावरून आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी तहसील कार्यालय, ग्रामीण रुग्णालय परिसरामध्ये चिंच, पिंपळ, वड, लिंबू, करणं, जांभूळ, बाभूळ यासारख्या वृक्षांचे रोपण करून वृक्ष लागवड करण्यात आली. राजमाता



जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, एमसीसी कॅडेट्स व विद्यार्थी उस्फूर्तपणे वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी झाले. या वृक्षारोपणामध्ये नगरपरिषद व तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, धारूर शहरातील नागरिक, पत्रकार अतुल शिनगारे, हनुमंत खामकर, संदिपान तोंडे तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांना उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, प्रा. बाळासाहेब जोगदंड, डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी घन वृक्ष लागवड मोहीमेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये सहभागी सर्व स्वयंसेवक, कॅडेट्स व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी घन वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जिल्हाधिकारी बीड यांनी तलवाडा तलाव लगटच्या आतिक्रमणाची दखल न घेतल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन आटळ!

**तलवाड़ा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलावाच्या संरक्षण भिती लगट आतिक्रमण धारकांनी मोठ्या प्रमाणात आतिक्रमण करत गाव तलाव फुटन्याची परिस्थिति निर्माण केल्याने गावातील सामाजिक कार्यकर्ते वारंवार शासन आणी प्रशासनाच्या संबंधित विविध विभागाला वेळो वेळी अवगत करत असुन तालुका स्तरीय व स्थानीय प्रशासन या आतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्या ऐवजी आर्थिक देवाण घेवाण करुन ऊलट आतिक्रमण धारकांना बांधकाम करण्यास प्रोत्साहित करत असल्याचे वारंवार निदर्शनास येत असल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी आता जिल्हाधिकारी बीड यांना दिनांक ६/८/२०२५ रोजी निवेदन दिले असुन निवेदनात म्हण्टले आहे की मौजे तलवाडा येथील सरकारी गायरान जमीनी मध्ये असलेल्या पाझर तलावाच्या भिंतीलगट बेकायदेशीरपणे केलेले



व आज रोजी करत असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्याच तलावात जलसमाधी आंदोलन करणार आहोत. निवेदनात पुढे म्हण्टले आहे की की आम्ही दिनांक ३०/६/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, तहसील कार्यालय गेवराई व पंचायत समिती गेवराई यांना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे हे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबतीत वारंवार निवेदन दिले होते पण आजपर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक १५/७/२०२५ रोजी सन्माननीय विभागीय आयुक्त संभाजीनगर यांना निवेदन दिले होते. तरी सुध्दा अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा लेखी स्वरूपातील सक्त आदेश आल्याशिवाय स्थानीय प्रशासकीय अधिकारी कोणत्याही प्रकारची कारवाई करतच नाहीत हे अगदी स्पष्ट उघड उघड सत्य आहे.

म्हणून मी शेख खिजर जैनोदीन व माझे सहकारी जयदेव शिंगने असे आम्ही दोघांनी मिळुन असा निर्णय घेतला की आम्ही १५/८/२०२५ रोजी तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या त्याच पाझर तलावात स्थानीय प्रशासकीय आधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेच्या व टाळाटाळ करण्याच्या चालीविरोधात जलसमाधी घेणार आहोत. दोघांनाही पोहता येत नसल्याकारणाने आमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची असेल आमच्या दोघांच्याही कुटुंबातील लोकांची जबाबदारी ही शासनाची राहील व ह्यास संपूर्ण जबाबदार हे प्रशासन राहील. आसे निवेदनाच्या शेवटी निवेदन कर्त्यांनी म्हण्टले आहे.

# तलवाडा येथील छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक रस्ता होणार कधी ?

## काही दिवसातच होणार गणरायाचे आगमन विसर्जन मिरवणुकी पूर्वी तरी हा रस्ता करा!

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील व्यावसायिक दृष्ट्या जवळपास कमी जास्त प्रमाणात सदुसष्ट गावाचा जनसंपर्क होत आसतांना गावात जाणारा मुख्य डांबरी रस्ता छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक डॉ. बाबासाहेब अंबेडकर चौक हा होणार कधी आसा प्रश्न गावकऱ्यातुन सातत्याने उपस्थित केला जात आसतांना राजकिय मंडळी मात्र या कडे काना डोळा करत असल्याचे बोलल्या जात आहे. या बाबत अधिक माहीती आशी तलवाडा येथील छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक डॉ बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंतचा डांबरी रस्ता खड्यात रस्ता आहे की रस्त्यात खंडे आहेत हे आणेकांना ऊमजत नसले तरी या रस्त्याने जाणा-या येणा-या वाहन धारक व पाई चालणा-या वाट सरुंना एक किलोमीटरचा हा रस्ता आणेक प्रकारे वेदनादाई ठरत आहे. पाई चालतांना शाळकरी विध्यार्थ्यांसह वयोवृद्ध महिला पुरुषांना पाय मुरडने लचके बसने चालतांना तोल जाने आस्या प्रकारे यातना भोगाव्या लागत असुन वाहन चालकांचा तर खड्यांमुळे आणेक वेळा वाहनावरचा ताबा सुटलेला आहे सुदैवाने दुर्घटना होता होता राहिलेल्या आसल्याचे वाट सरु नागरिकांकडुन समजते. त्यातच आता काही दिवसांनी तलवाडासह राज्यभरात गणरायाचे आगमन होणार आसल्याने गणपती विसर्जन काळात या रस्त्याने बप्पांच्या मूर्तीची काळजी घेत तारेवरची कसरत करत याच खराब झालेल्या डांबरी रस्त्याने विसर्जन स्थळा पर्यंत जावे लागत आसल्या कारणाने वाहन चालक, व पाई चालणा-या वाट सरुंच्या काळजीसह गणेश भक्तांच्या भावनेचा आदर करत डांबरी रस्ता लवकर करण्यात यावा.

---

बीड तालुका

**समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था (म.),बीड**

नोंदणी क्रमांक :- बीएचआर/(बीएचाआर)/बीएनके/401/2008 दिनांक 29.09.2008

(फक्त सभाससदांसाठी)

**सतराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस**

**बीड तालुका समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था म. बीड** पतसंस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते कि,संस्थेची सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा **दिनांक २४ ऑगस्ट २०२५ , रविवार रोजी स. १२.००** वाजता संस्थेच्या अध्यक्षा मा.अयोध्या नामदेव टपले यांच्या अध्यक्षतेखाली **औटी मंगल कार्यालय, जालना रोड, बीड** येथे आयोजीत केली आहे. कृपया संस्थेच्या सर्व सभासदांनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**□ सभेपुढील विषय :-**

1. दिनांक २५/०८/२०२४ रोजी झालेल्या सोळाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
2. संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२४ -२०२५ वर्षाचा सतरावा वार्षीक अहवालाचे वाचन व मान्यता देणे.
3. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन आणि स्वीकृत करणे.
4. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकावर चर्चा करणे आणि स्वीकृत करणे.
5. पुढील वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची माहिती देणे आणि स्वीकृत करणे.
6. गतवर्षाच्या अंदाजपत्रकातिल तरतुदी आणि प्रत्यक्ष झालेला खर्च यामधील तफावतीवर चर्चा करून मान्यता देणे.
7. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे आणि लेखा परीक्षणासाठी मानधनास मान्यता देणे.
8. मागील लगतच्या वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरूस्ती अहवालावर चर्चा करून मान्यता देणे.
9. कायदा व नियमास अनुसरून नफा वाटणीस मान्यता देणे.
10. संचालक मंडळ सदस्य आणि त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
11. प्रशिक्षण / कर्ज /गुंतवणूक/ वसूली इत्यादी विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
12. सुधारित आदर्श उपविधीला मान्यता देणे.
13. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी विषयावर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे आदेशावरुन.**

**छाया नितिन गवळी**

**सचिव**

**□ सुचना:-**

१.अहवाल वर्षातील संस्थेचे दफ्तर व आर्थिक पत्रके संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

२.अहवाल वर्षातील संस्थेच्या व्यवहाराविषयी सभासदांस काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्यांचे प्रश्न/सुचना सही व नावानिशी दिनांक २३/०८/२०२५ पर्यंत पाठवावे.नंतर आलेल्या प्रश्नांचा व सुचनांचा विचार केला जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**□ गणपुर्ती:-**

ठरलेल्या वेळी सभेस गणपुर्ती नाही झाली तर तिच सभा त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात यईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

---

**समताशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्था, बीड**

नोंदणी क्रमांक :- बीएचआर /बीएचआऱ/आऱ एस आऱ /सीआऱ /152/2021

(फक्त सभाससदांसाठी)

**चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस**

समताशक्ती महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते कि,संस्थेची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा **दिनांक २४ ऑगस्ट २०२५ , रविवार रोजी स. ११.००** वाजता संस्थेच्या अध्यक्षा मा. संगीता पंडितराव पाठक यांच्या अध्यक्षतेखाली **औटी मंगल कार्यालय, जालना रोड, बीड** येथे आयोजीत केली आहे. कृपया संस्थेच्या सर्व सभासदांनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**□ सभेपुढील विषय :-**

1. दिनांक २५/०८/२०२४ रोजी झालेल्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
2. संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२४ -२०२५ वर्षाचा चौथ्या वार्षीक अहवालाचे वाचन व मान्यता देणे.
3. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन आणि स्वीकृत करणे.
4. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकावर चर्चा करणे आणि स्वीकृत करणे.
5. पुढील वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची माहिती देणे आणि स्वीकृत करणे.
6. गतवर्षाच्या अंदाजपत्रकातिल तरतुदी आणि प्रत्यक्ष झालेला खर्च यामधील तफावतीवर चर्चा करून मान्यता देणे.
7. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे आणि लेखा परीक्षणासाठी मानधनास मान्यता देणे.
8. मागील लगतच्या वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरूस्ती अहवालावर चर्चा करून मान्यता देणे.
9. कायदा व नियमास अनुसरून नफा वाटणीस मान्यता देणे.
10. संचालक मंडळ सदस्य आणि त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
11. प्रशिक्षण / कर्ज /गुंतवणूक/ वसूली इत्यादी विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
12. संस्थेच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा रु 100 लक्ष वरून रु 200 लक्ष करणे बाबत मान्यता देणे .
13. सुधारित आदर्श उपविधीला मान्यता देणे.
14. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी विषयावर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे आदेशावरुन.**

**शुभांगी कुलकर्णी**

**कार्यकारी संचालक**

**□ सुचना:-**

१.अहवाल वर्षातील संस्थेचे दफ्तर व आर्थिक पत्रके संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

२.अहवाल वर्षातील संस्थेच्या व्यवहाराविषयी सभासदांस काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्यांचे प्रश्न/सुचना सही व नावानिशी दिनांक २३/०८/२०२५ पर्यंत पाठवावे.नंतर आलेल्या प्रश्नांचा व सुचनांचा विचार केला जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**□ गणपुर्ती:-**

ठरलेल्या वेळी सभेस गणपुर्ती नाही झाली तर तिच सभा त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात यईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### शाश्वत शेती काळाची गरज : दादाराव जाधवर, कृषी उपसंचालक



**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ एम एस स्वामीनाथन यांचा जन्मदिन ७ ऑगस्ट हा शाश्वत शेती दिन साजरा करणे बाबत शासनाने दिलेल्या आदेशानुसार मा श्री सुभाष साळवे , प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड यांचे मार्गदर्शन खाली श्री अशोक साळी,तालुका कृषी अधिकारी बीड यांचे टीम मार्फत आज दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी मौजे ईट ता जि बीड येथे कृषी विभाग, आत्मा बीड व कृषी विज्ञान केंद्र खामगाव ता गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ एम एस स्वाम ीनाथन यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने शाश्वत शेती दिनाचे औचित्य साधत किसान गोष्टी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वाम ीनाथन यांचे प्रतिमेला पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरवात करताना यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा श्री गणपत डोईफोडे सरपंच हे होते तर प्रमुख पाहुणे मा. श्री दादाराव जाधवर कृषी उपसंचालक,बीड, मा. श्री सुरज पाटील, प्रकल्प उपसंचालक आत्मा, बीड, श्री हनुमंत गरुड, प्रमुख शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, खामगाव ता गेवराई, श्री तुकेश सुरूपम, श्री बी टी येवले, शास्त्रज्ञ हे उपस्थित होते. यावेळी बी टी येवले शास्त्रज्ञ यांनी कापूस पिकाची कीड व रोग व्यवस्थापन, खते व फवारणी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. श्री हनुमंत गरुड, प्रमुख शास्त्रज्ञ यांनी कापूस व सोयाबीन या पिकांच्या सध्य परिस्थिती व खत व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन या बाबत सविस्तर मामार्गदर्शन करतांना सरी वरंबा पद्धत या विषयी माहिती सांगितली. श्री तुकेश सुरूपम यांनी कृषी क्षेत्रातील यांत्रिकरणाचे महत्व विषद केले. मा. श्री सुरज पाटील, प्रकल्प उपसंचालक आत्मा, बीड यांनी भारतरत्न एम एस स्वामीनाथन यांचे कार्य व त्यांनी केलेले संशोधन व त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांचे जीवन या बाबत माहिती सांगितली आणि शाश्वत शेतीचे महत्व विषद केले. मा श्री दादाराव जाधवर, कृषी उपसंचालक यांनी शाश्वत शेती म्हणजे काय आणि काळजी गरज या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून द्या

## लोकशाही पत्रकार संघाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांनी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून देशाचे व समाजसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबीयांना राहण्यासाठी घर बांधता आले नाही. परंतु आजच्या काळात आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे या भावनेतून आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सदैव तळमळ करणाऱ्या पत्रकारांची वेदना आणि व्यथा लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्ञबीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार



**● लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दिलेल्या निवेदनाची दखल घेत अजित पवार यांनी दुसऱ्याच दिवशी झालेल्या पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देत असताना बेघर नागरिकांसह पत्रकारांना घरकुल देणार आहोत. ज्यांना घर बांधण्यासाठी जागा नाही अशा पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.**

यांनी पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या मागणीचे निवेदन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांनी दिले. बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेला मोठा इतिहास आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा माणून या जिल्ह्यातील अनेक गुणी पत्रकार तुटपुंज्या म ानधनावर काम करत होते शिवाय आहेत ही जिल्ह्यातील अनेक पत्रकारांनी पत्रकारितेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य वेचले, आपल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# श्री क्षेत्र चाकरवाडी म्हणजे परमार्थाचे उभे पीक बालाजी महाराज बोराडे यांचे प्रतिपादन

## बीड जिल्हा संतांची भूमी म्हणुन ओळखली जाते

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये भजन केलं तर पुण्य भेटते. जुने माणसे खूप भाग्यवान असतात. परमार्थाचे उभे पिक हे चाकरवाडी मध्ये आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील एकमेव ठिकाण २४ तास अन्नदान सेवा सुरू आहे ते म्हणजे श्री क्षेत्र चाकरवाडी आहे. प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आणि



ह. भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व बाळनाथ महाराज यांचा पालखी सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाची कीर्तन सेवा ह. भ. प बालाजी म हाराज बोराडे यांची संपन्न झाली.

जगामध्ये सर्वोत्तम सेवा कोणती असेल तर ती संत सेवा आहे त्या साठी संतांची सेवा करा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची कमी पडणार नाही. दादा माऊली यांच्या आशीर्वादाने कोणत्याच गोष्टीची कमतरता पडणार नाही. दादा म ाऊली यांची तुम्ही सेवा करा असा ▶▶ उर्वरित पान २ वर

# वारकरी संप्रदायाचे मूळ नाथपरंपरेतून आहे : विशाल महाराज खोले

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची प्रचंड गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो ७०० ते ८०० वर्षापासून सुरू आहे. अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तक धरून आहे या वारकरी संप्रदायाचे मूळ नातं परंपरेतून आहे असे गौरव उद्गार विशाल महाराज खोले यांनी केले.

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज



यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल म ार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा ▶▶ उर्वरित पान २ वर

# हरित बीड अंतर्गत लिंबागणेश येथे पोलिस प्रशासनाच्या प्रअभियानमुख उपस्थितीत वृक्षारोपण : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र अभियानाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात येणाऱ्या' हरित बीड' या संकल्पनेतून आज दि. ०७ गुरुवार रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

या अभियानात जिल्हा प्रशासनाने वर्षभरात १ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला असून, आज एकाच दिवसात ३० लाख झाडांची लागवड करून हा विक्रम इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंदवण्याचा मानस आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हा प्रशासन,



शासकीय संस्था आणि सामाजिक संघटनांना विशेष सूचना देत वृक्षलागवडीत सामूहिक सहभागाचे आवाहन केले आहे. या मोहिमेअंतर्गत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायतच्या वतीने सार्वजनिक स्मशानभूमी, गणेश मंदिर, ग्रामपंचायत परिसर या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, नेकनूर पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, तसेच पिंपळवंडी बीटचे सहाय्यक फौजदार गोविंद बडे उपस्थित होते. वृक्षलागवडीत सरपंच बालासाहेब जाधव, ग्राम विकास अधिकारी श्रीराम वीर, डॉ. गणेश ढवळे,सेवा सोसायटी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मोक्कातील लिडर सतीश चांदणे यास जामीन मंजूर

## ॲड. शिवदर्शन खेडकर (गदळे) यांमार्फत जामिनासाठी अर्ज केला होता

**वडवणी । प्रतिनिधी**

पुणे येथील खडकी पोलीस स्टेशन येथे १७/०९/२०२४ या गुन्ह्याची नोंद पुणे येथील खडकी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती या प्रकरणी मकोका कायद्यान्वये गँग लीडर/टोळी प्रमुख हितेश उर्फ बापू सतीश चांदणे यास पुणे येथील सन्मानीय जिल्हा व अतिरिक्त विशेष सत्र न्यायाधीश यांनी दि. २८/०७/२०२५ रोजी जमीन मंजूर केला. या प्रकारात आरोपी तर्फे ॲड. शिवदर्शन महादेव खेडकर (गदळे) यांनी



युक्तिवाद केला व त्यांच्या समावेत ॲड. एस. आर. सावंत व ॲड. एन. व्ही शिंदे यांनी काम पाहिले. या गुन्ह्याची नोंद पुणे येथील खडकी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. ▶▶ उर्वरित पान २ वर



*गेवराई: तालुक्यातील हिरापूर परिसरातील विद्यार्थ्यांना कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी या शाळेत जाण्यासाठी बस सेवा सुरू केल्या बद्दल प्राचार्य अण्णासाहेब थिटे आणि बस चालक, वाहकाचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी परसराम गुंजाळ, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय मुंजाळ, उत्तरेश्वर कायस्थ,ओमकार प्रभाळे, अमजद पठाण, राजेंद्र वाघमारे, संतोष गुंजाळ, अमोल धुतावळे यांच्यासह शिक्षक राजेश पंडित, शिवाजी धट,विनायक खाडप,सतीश बहीर आदि.*

# शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे फुंकले रणशिंग

## शिवसैनिकांनो, आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी मंत्री ना. उदय सामंत ; शिवसेना नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आढावा बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा. तळागाळात जाऊन संघटना बांधणी करून पक्ष मजबूत करा. गरज पडेल तिथे आवाज द्या, अगदी शाखेच्या उदघाटनासाठी देखील आम्ही येऊ. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब आपल्यासोबत पूर्ण ताकदीने आहेत. असा विश्वास देत

महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत साहेब यांनी बीड शिवसैनिकांमध्ये प्रचंड जोश निर्माण केला. काल दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता म



हाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, शिवसेना उप नेते माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, म राठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्याकडून बीड जिल्ह्याचा आढावा शिवसेना नेत्यांसमोर सादर करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात आले. तसेच शिवसेना नेत्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी मुक्तसंवाद साधत सर्व समस्या जाणून घेत त्यांना आम्ही तुम्हाला ताकद देतो, तुम्ही संघटना मजबूत करा, सदस्य नोंदणीवर अधिक काम करा, स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकला पाहिजे. असा ठणठणीत आदेश मंत्री ना. उदय सामंत यांच्यासह शिवसेना नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

### एकनाथजी शिंदेसाहेब सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव असणारे नेते: भाऊसाहेब चौधरी

**महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणारा नेता आहे, कार्यकर्त्यांच्या सुख दु:खात सहभागी होणारा नेता आहे. स्व बाळासाहेब ठाकरे आणि आनंदजी दिघे साहेबांच्या संस्काराची शिदोरी घेऊन शिंदे साहेब महाराष्ट्र हितासाठी अहोरात्र धडपड करतायत. यामुळे आपल्याला देखील शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्ष संघटन वाढवावे लागणार आहे. असे शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.**

### पक्षसंघटनेच्या कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही: संजय मोरे

**विधानसभा निवडणुकीच्या भरीव यशानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्वपूर्ण टप्पा असून पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्याकरिता सदस्य नोंदणीवर अधिक काम करने गरजेचे आहे. पक्षसंघटनेच्या कामात किंचितही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही असे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी आढावा बैठकीत पदाधिकाऱ्यांना ठणकाउन सांगितले.**